॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

*** सुविचार ***

प्रयत्न करणे कधीही सोडू नका,
अपयश हा यशाच्या मार्गातील
फक्त एक टप्पा आहे.

अहिल्यानगर ■ सोमवार, दि. ३ ऑगस्ट २०२६ | वर्ष ७ वे | अंक ५७ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

# महाराष्ट्रात धर्मांतरविरोधी कायदा लागू

## राष्ट्रपतींची मंजुरी । बेकायदेशीर धर्मांतर केल्यास सात वर्षे कारावास

**● नवी दिल्ली । वीरभूमी –**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची मंजुरी मिळाल्यानंतर आणि अधिकृत राजपत्रात (गॅझेट) प्रकाशित झाल्यानंतर राज्यात धर्मांतरविरोधी कायदा–महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य कायदा, २०२६ आता राज्यात लागू झाला. हा कायदा ३० जुलै रोजी अधिकृत राजपत्रात प्रकाशित झाला आणि त्याच तारखेपासून तो अंमलात आला. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार आता राज्यात बेकायदेशीर धर्मांतराच्या प्रकरणांत नवीन कायद्यातील तरतुदींनुसार कठोर कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते.

राज्य विधिमंडळाने मार्चमधील अर्थसंकल्पीय अधिवेशनात हा कायदा मंजूर केला होता आणि त्यानंतर तो मंजुरीसाठी राज्यपाल व नंतर राष्ट्रपतींकडे पाठवण्यात आला होता. हा कायदा बळजबरी, फसवणूक, आमिष, चुकीची माहिती किंवा लग्नाचे आश्वासन देऊन केल्या जाणाऱ्या धर्मांतरास



प्रतिबंध करतो. या कायद्याचे उल्लंघन केल्यास ७ वर्षांपर्यंतच्या कारावासाची तरतूद आहे तर पुन्हा गुन्हा करणाऱ्यांसाठी ही शिक्षा १० वर्षांपर्यंत वाढू शकते. धर्मांतरापूर्वी जिल्हा दंडाधिकाऱ्यांना ६० दिवस आधी सूचना देणे यात अनिवार्य करण्यात आले आहे; तसेच धर्मांतरित व्यक्तीचे पालक, भावंडे आणि इतर नातेवाईक यांना तक्रार करण्याचा अधिकारही यात देण्यात आला आहे.

विधानसभेत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (एसपी), समाजवादी पक्ष आणि सीपीआय (एम) यांनी या विधेयकाला विरोध केला होता. मात्र, शिवसेनेने (ठाकरे गट) त्याला पाठिंबा दिला होता. काँग्रेसच्या आमदारांनी विधानसभेत असा युक्तिवाद केला होता की, हा कायदा घटनाबा असून तो गोपनीयतेच्या अधिकाराचे उल्लंघन करणारा आहे. समाजवादी पक्षाचे म्हणणे होते की, हा कायदा एका विशिष्ट समुदायाला लक्ष्य करण्यासाठी आणला गेला. विरोधकांची अशी मागणी होती की, हे विधेयक संयुक्त निवड समितीकडे पाठवले जावे.

### ॲड. प्रकाश आंबेडकर देणार कोर्टात आव्हान

■ वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश आंबेडकर यांनी आम्ही धर्मांतरविरोधी कायद्याला कोर्टात चॅलेंज करणार आहोत. मुंबई हाय कोर्टात याला चॅलेंज करू, असे सांगितले. या कायद्याला राज्यातील विरोधी पक्षांनीही आवाज उठविला. परंतु सरकार एक एक कायदे बदलत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

### जबरदस्तीने होणारे धर्मांतर रोखले जाणार

■ या कायद्याचे समर्थन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले, बळजबरीने किंवा फसवणूक करून होणाऱ्या धर्मांतराला आळा घालणे हा याचा उद्देश आहे; स्वेच्छेने होणारे धर्मांतर किंवा आंतरधर्मीय विवाह यांना लक्ष्य करणे हा याचा उद्देश नाही. मध्य प्रदेश, ओडिशा, छत्तीसगड, उत्तर प्रदेश आणि हिमाचल प्रदेश यांसारख्या किमान १२ राज्यांमध्ये यापूर्वीच धर्मांतर–विरोधी कायदा अस्तित्वात आहे.

## SPOT NEWS

### शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांना खासगी प्रॅक्टिस बंदी कायम

**● मुंबई –** उच्च न्यायालय, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी ३० जुलै २०२६ रोजी दिलेल्या ऐतिहासिक निर्णयामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागातील शासकीय वैद्यकीय अधिका–यांना खासगी वैद्यकीय व्यवसाय करता येणार नाही, असे स्पष्ट केले आहे. तयेच या विषयासंदर्भातील दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या सर्व याचिका फेटाळून लावल्या आहेत. मा. न्यायालयाने आपल्या निर्णयात नमूद केले की, शासन सेवेत कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी हे महाराष्ट्र नागरी सेवा नियम व शासनाच्या धोरणानुसार बांधील असून, त्यांनी पूर्णवेळ शासकीय सेवा बजावणे अपेक्षित आहे. त्यामुळे शासकीय सेवेत असताना खासगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास परवानगी देता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. या निर्णयामुळे सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला मोठा दिलासा मिळणार असून, ग्रामीण व शहरी भागातील शासकीय रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची उपस्थिती आणि रुग्णसेवा अधिक प्रभावी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. या महत्त्वपूर्ण प्रकरणात शासनाच्या वतीने सहायक शासकीय अभियोक्ता अतुल काळे यांनी प्रभावीपणे बाजू मांडली.

### आयएनएस विक्रांत वर राफेल तैनात

**● नवी दिल्ली –** हिंद महासागरात भारताची लष्करी ताकद वाढली आहे. कराचीसह संपूर्ण पाकिस्तानी किनारपट्टी भारतीय नौदलाच्या टप्प्यात आहे. नौदलासाठी अत्याधुनिक राफेल–एम खरेदी करण्यात आलेली आहे. लवकरच हे अत्याधुनिक लढाऊ विमान विमानवाहू युद्धनौका आयएनएस विक्रांतवर तैनात करण्यात येतील. या नवीन घडामोडींमुळे पाकिस्तानच्या चिंता वाढल्या आहेत. समुद्रातील आव्हाने पेलणे शेजारील देशाला दिवसागणिक अवघड होत आहे. पाकिस्तानी संरक्षण तज्ज्ञानुसार, विमानवाहू युद्धनौका आयएनएस विक्रांतवर राफेल–ट राफेल तैनात झाल्यावर भारतीय नौदलाची मारक क्षमता कित्येकपटीने वाढले. चीनच्या जीवावर उड्या मारणाऱ्या पाकिस्तानसाठी ही धोक्याची घंटा मानली जात आहे. पाकिस्तानने त्यांच्या नौदलात गेल्या काही वर्षात चीनकडून खरेदी केलेल्या जे–१० सीई मल्टिरोल लढाऊ विमानांचा भरणा केला आहे. अमेरिकेच्या संरक्षण विभागानुसार पाकिस्तान वायुदलाकडे असे ३६ लढाऊ विमान आहेत. भारताने २०२५ मध्ये फ्रान्सकडून नौसेनेसाठी २६ राफेल–ट लढाऊ विमानांची खरेदी करण्याचा निर्णय घेतला होता.

## केंद्राकडून 'यूआरएस' कांदा खरेदी बंद; राज्यभरात शेतकरी आक्रमक

**● नाशिक । वीरभूमी–**

केंद्र सरकारने कांदा खरेदीच्या धोरणात अचानक बदल करीत यूआरएस श्रेणीच्या कांद्याची खरेदी ३० जुलैपासून पूर्णत: बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे नाशिक जिल्हा आणि राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. या नव्या निर्णयानुसार आता केवळ 'अ' श्रेणीच्या चांगल्या प्रतीच्या कांद्याचीच खरेदी केली जाणार आहे.

यासोबतच सरकारने किंमत स्थिरता निधीअंतर्गत खरेदी केल्या जाणाऱ्या कांद्याचा दर प्रतिक्विंटल दोन हजार ३३५ रुपये, असा सुधारित केला आहे. नाफेड आणि 'एनसीसीएफ' या दोन्ही केंद्रीय खरेदी संस्थांना २५ मेपासून महाराष्ट्रात पाच लाख टन कांदा खरेदीचे उद्दिष्ट देण्यात आले होते. सुरुवातीच्या काळात या संस्थांनी चांगल्या कांद्यासोबतच यूआरएस म्हणजेच लहान आणि काहीसा डागी स्वरूपाचा कांदाही खरेदी केला होता. मात्र, आता अचानक ही खरेदी थांबवण्यात आल्यामुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत.



चांदवड तालुक्यातील मंगरूळ येथे परराज्यातून आणलेला निकृष्ट दर्जाचा कांदा नाफेड खरेदी केंद्रावर खपविण्याचा प्रयत्न उघडकीस आला. स्थानिक शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर तहसीलदार अनिल चव्हाण यांच्या आदेशाने महसूल, कृषी विभाग व कृषि उत्पन्न बाजार समितीच्या संयुक्त पथकाने गुरुवारी रात्री शेडवर धाड टाकली. विश्वजित शाहू यांच्या पत्र्याच्या शेडमध्ये इंदोर येथून आणलेला १० ते २० मिमी आकाराचा चिंगळी व गोल्टी कांदा आढळला. धुळे येथील संजयकुमार बाबूलाल अग्रवाल यांनी कांदा इंदोरहून आणल्याचे मान्य केले. पथकाने सुमारे ६०० क्विंटल कांदा जप्त केला असून, नायलॉन बारदान पिशव्याही आढळल्या. स्थानिक शेतकऱ्यांचा माल डावलून बाहेरील हलका कांदा घुसविला जात असल्याचा आरोप आहे. तहसीलदारांनी नाफेडला सखोल चौकशी व कारवाईचे निर्देश दिले.

## कुकडी लाभक्षेत्रासाठी ओव्हरफ्लोचे पाणी सोडा

### १३२ क्रमांकाच्या वितरिकेची प्रतीक्षा । १५ गावांतील शेतीला पाण्याची गरज

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

कुकडी पाणलोटक्षेत्रात सुरू असलेल्या पावसामुळे कुकडी प्रकल्प ओसंडून वाहत असताना लाभक्षेत्रात मात्र पावसाने अपेक्षित साथ न दिल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. प्रकल्पातील ओव्हरफ्लोचे पाणी विविध भागांत सोडले जात असताना श्रीगोंदा तालुक्यातील १३२ क्रमांकाच्या कुकडी मुख्य पाटाच्या वितरिकेलाही पाणी सोडावे, अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

श्रीगोंदा तालुक्यातील सुमारे १५ गावांसाठी ही वितरिका जीवनदायिनी ठरली आहे. १९९० मध्ये विसापूर तलावातून शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी तिची निर्मिती करण्यात आली. पुढे कुकडी प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर तिचा कुकडी पाटबंधारे विभागात समावेश करण्यात आला.

घारगाव, मढेवडगाव, बाबुर्डी, म्हातारपिंप्री, शिरसगाव बोडखा, लोणी व्यंकनाथ, बेलवंडी, पारगाव, बोरुडेवाडी, मखरेवाडी, खेतमाळीसवाडी, वेळू, चोराचीवाडी, लिंपणगाव, होलेवाडी व श्रीगोंदा या गावांतील शेती तसेच काष्टी गावाच्या पिण्याच्या पाण्यासाठी या वितरिकेचा उपयोग होतो.

या वितरिकेवर तब्बल २८ सहकारी पाणी वापर संस्था असून प्रत्येक संस्थेअंतर्गत सरासरी २५० ते ३०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येते. ऊस, डाळिंब, लिंबू व द्राक्षांच्या मोठ्या क्षेत्रासाठी या पाण्याचा आधार आहे. मात्र वितरिकेची वहनक्षमता २०० क्युसेक्स असताना दुरवस्था व गळतीमुळे प्रत्यक्षात सुमारे ५० ते १०० क्युसेक्सपर्यंतच पाणी वाहत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. अनेक ठिकाणी झाडेझुडपे वाढली असून माती–मुरूम ढासळल्याने वितरिकेची क्षमता कमी झाली आहे. काही उपवितरिकाही अस्तित्वात नसल्याची तक्रार आहे.

दरम्यान, कुकडी प्रकल्पातून ओव्हरफ्लो आवर्तन सुरू असून कर्जत–जामखेड भागात सर्वदूर पाणी खेळत असताना श्रीगोंदा तालुक्यातील शेतीसाठी पाणी कधी मिळणार, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. पिण्याच्या पाण्याचे स्रोत भरण्याला प्राधान्य देतानाच उपलब्ध ओव्हरफ्लो पाण्यातून शेतीसाठीही आवर्तन द्यावे, अशी मागणी होत आहे.

### आज ओव्हरफ्लो पाण्याची गरज

■ सध्या कुकडी प्रकल्प पूर्ण भरल्याने उपलब्ध होणारे ओव्हरफ्लोचे पाणी श्रीगोंदा तालुक्यातील शेतीला मिळावे, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. कुकडीचे पाणी उपलब्ध असताना १३२ वितरिकेच्या लाभक्षेत्रातील शेती तहानलेली राहू नये. सर्व पाणी वापर संस्थांनी तातडीने मागणी नोंदवून प्रशासनानेही शेतीसाठी ओव्हरफ्लो आवर्तनाचा विचार करावा.

**– ऋषीकेश वाबळे,** प्रगतिशील शेतकरी

### मागणी अर्जाशिवाय पाणी सोडता येत नाही

■ १३२ वितरिकेवरील २८ पैकी सध्या केवळ चार पाणी वापर संस्थांनी शेतीसाठी पाण्याची मागणी नोंदवली आहे. उर्वरित संस्थांनीही रीतसर मागणी अर्ज करणे आवश्यक असून, त्यानंतर वरिष्ठांकडे प्रस्ताव सादर करता येईल. पिण्याच्या पाण्याचे स्रोत भरल्यानंतर शेतीसाठी पाण्याबाबत निर्णय घेतला जाईल. कागदोपत्री मागणी नसताना पाणी सोडणे नियमांच्या चौकटीत शक्य नसते.

**– प्रवीण घोरपडे,** कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.२

# राष्ट्रकुल स्पर्धेत भारताने केली ३९ पदकांची लयलूट

## भारतीय बॉक्सरनी एकूण १० पदके जिंकली असून, त्यापैकी ७ सुवर्ण पदकांचा समावेश । ॲथलिटस्कडून निराशा

**● नवी दिल्ली । वीरभूमी –**

ग्लासगो येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत भारताने शानदार प्रदर्शन करीत एकूण ३९ पदकांची लयलूट केली. या स्पर्धेत खऱ्या अर्थाने भारतीय बॉक्सरनी कमाल केली. भारतीय बॉक्सरनी एकूण १० पदके जिंकली असून, त्यापैकी ७ सुवर्ण पदकांचा समावेश आहे. अखेरच्या दिवशी आज भारतीय ॲथलिटस् काही तरी कमाल करतील आणि पदकांची संख्या आणखी वाढेल, अशी अपेक्षा होती. परंतु भारतीय ॲथलिटस्नी निराशा केली.

राष्ट्रकुल स्पर्धेत आज अखेरच्या दिवशी भारतीय ॲथलिटस्ना देशासाठी काही तरी करून दाखविण्याची संधी होती. भारताच्या पदक तालिकेत आणखी वाढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. परंतु भारतीय ॲथलिटस् या स्पर्धेत अपयशी ठरले. त्यामुळे भारताला ३९ पदकांच्या वर मजल मारता आली नाही. त्यामुळे या राष्ट्रकुल स्पर्धेत भारत सर्वाधिक पदके जिंकणाऱ्या देशांच्या यादीत चौथ्या क्रमांकावर राहिला.

राष्ट्रकुल स्पर्धेत भारताने १३ सुवर्ण, १७ रौप्य आणि ९ कांस्य अशी ३९ पदके पटकावली.भारतापुढे आता ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि कॅनडा हे ३ देश आहेत. या यशात सर्वात मोठा वाटा भारतीय बॉक्सरचा आहे. कारण भारताचे १० बॉक्सर अंतिम फेरीत दाखल झाले आणि त्यातील ७ जणांनी सुवर्ण पदकाची कमाई केली तर ३ जणांनी रौप्य पदक जिंकत इतिहास घडविला.

राष्ट्रकुल स्पर्धेच्या इतिहासात भारताने सर्वाधिक पदके २०१० च्या स्पर्धेत जिंकली होती. ही स्पर्धा राजधानी दिल्लीत झाली होती. त्यावेळी भारतीय ॲथलिटस्नी घरच्या मैदानात १०१ पदकांची लयलूट केली होती. त्यामुळे ३८ सुवर्ण, २७ रौप्य आणि ३६ कांस्य पदके जिंकली होती. भारताचे हे सर्वोत्तम प्रदर्शन राहिलेले आहे.

२०१८ मध्ये गोल्ड कोस्टमध्ये आयोजित स्पर्धेतही भारताने ६६ पदके जिंकली होती. यात २६ सुवर्ण होती. याशिवाय २० रौप्य आणि २० कांस्य पदके पटकावली होती. तत्पूर्वी २०१४ मध्येही ग्लासगोत झालेल्या राष्ट्रकुल



स्पर्धेत ६४ पदकांची कमाई केली आणि १९ कांस्य पदके पटकावली होती. त्यामध्ये १५ सुवर्ण, ३० रौप्य होती.

# SPOT NEWS

## अण्णाभाऊ साठे व वीर लहुजी वस्ताद साळवे यांचे पूर्णाकृती पुतळे उभारणार

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
लोकशाही अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त सिद्धार्थ नगर येथील अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास आमदार संग्राम जगताप यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेल्या महापुरुषांनी केवळ राज्यालाच नव्हे तर संपूर्ण देशाला दिशा देण्याचे कार्य केले आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य व शाहिरीच्या माध्यमातून समाजप्रबोधनाची चळवळ उभी केली. त्यांनी ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत सर्वसामान्यांमध्ये सामाजिक जागृती निर्माण केली आणि अन्यायाविरोधात आवाज बुलंद केला.ते पुढे म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आहे. शिक्षण हे प्रत्येक व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी साधन असून ज्ञानाच्या बळावर व्यक्ती स्वतःच्या पायावर उभी राहून समाजालाही योग्य दिशा देऊ शकते. महापुरुषांचे विचार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. अहिल्यानगर शहरात महापुरुषांच्या विचारांचा वारसा जपत विकासालाही गती मिळत असल्याचे सांगत, समाजबांधवांशी चर्चा करून जागा निश्चित करण्यात येणार असून प्रशासनाची आवश्यक परवानगी व ठराव पूर्ण झाल्यानंतर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि वीर लहुजी वस्ताद साळवे यांचे पूर्णाकृती पुतळे अहिल्यानगरात उभारण्यात येतील, अशी घोषणा आमदार संग्राम जगताप यांनी केली. कार्यक्रमाच्या शेवटी अंकुश मोहिते यांनी समाजबांधवांच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांचे आभार मानले.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त लाल टाकी येथे विविध उपक्रम

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त लाल टाकी-भारस्कर कॉलनी येथे गौरवशाली मातंग इतिहास संवर्धन संघटन, मातंग एकता आंदोलन, सत्यशोधक बहुजन आघाडी, अखंड लाल टाकी मातंग समाज तसेच विश्व हिंदू परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक मोहित पंजाबी, जय भोसले, राम वडागळे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे महाराष्ट्र प्रांत संघचालक नानाजी जाधव, जनकल्याण रक्तपेढीचे अध्यक्ष अरुण मिस्त्री, सुनील खिस्ती, विश्व हिंदू परिषद महामंत्री नगर जिल्हा अनिल जोशी, राजेंद्र चुंबळकर, शरद नगरकर, चंद्रकांत काळोखे, सोमनाथ चितळकर, अनिल देवराव, शिवाजी वेतन, योगेश देवकर, बाळी जोशी, सागर खरे, निशांत नन्नवरे, निलेश साठे, विनोद शिरसाट, नितीन घोरपडे, आकाश जगधने, सुनील ढोले यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अकोळनेरात जहागीरदारांनी बांधले हनुमंताचे मंदिर

**गावकऱ्यांच्या मदतीने उभारली पडवी । मारुती मंदिरातील दोन शिलालेखांतून १३८ वर्षांचा इतिहास उजेडात**

■ विजय उंडे

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
पुणे-नगर मार्गावरील चासपासून सुमारे सहा किलोमीटर अंतरावर असलेल्या कसबे अकोळनेर येथील श्री मारुती मंदिरात दोन महत्त्वपूर्ण शिलालेख आढळून आले आहेत. मंदिराच्या सभामंडपाच्या खांबावर असलेला दगडी शिलालेख आणि आडव्या लाकडी तुळईवरील काष्ठशिलालेख यांतून मंदिराच्या उभारणीचा इतिहास समोर येतो.







पहिला शिलालेख ११ ओळींचा असून देवनागरी लिपीतील मराठी भाषेत आहे. त्यात कृष्णाजीराव व आपाजीराव जहागीरदार यांनी शालिवाहन शके १७८१ मध्ये मंदिराच्या बांधकामास सुरुवात करून शके १८०६ मध्ये ते पूर्ण केल्याची नोंद आहे. मंदिरासाठी ९०० रुपये खर्च झाल्याचे तसेच आपा दत्तू गवंडी व वसंतराव केडगावकर या कारागिरांची नावेही नमूद आहेत.

शिलालेखाचे वाचन :

१. श्री हनुमान प्रसन्न कसबे अको

२. ळनेर कृष्णाजी राव व आपाजी

३. राव राम जागीरदार यांनी शाली४. वाहन शके १७८१ साली आ५. रंभले ते शके १८०६ चैत्र६. शुद्ध १५ रोजी मोर्त कृष्णाजी७. जहागीरदार यांनी पुरे केले८. जहागीरदार यांची मदत मिळो९. न खर्च रुपये ९००।। राम ।।१०. कारागीर अपादत व गवंडी वहस ११. तराव केडगाव कर ।। राम ।।

यानंतर शके १८१९, हेमलंबी संवत्सर, चैत्र शुद्ध पौर्णिमा, शनिवार, म्हणजेच १७ एप्रिल १८९७ रोजी दाभोळकर जहागीरदारांनी गावाच्या मदतीने मंदिराची पुढील पडवी बांधल्याची नोंद काष्ठशिलालेखात आहे. या कामासाठी १०,४६५ रुपये खर्च झाल्याचे आणि स्थानिक सुतार कारागिरांची नावे नोंदविण्यात आली आहेत.

काष्ठशिलालेखाचे वाचन :

१. श्री हनुमान मंदिर कसबे आकोळणेर सिवी पुढील पडवीसके १८१९ हेमलंबी सवत्सर चैत्र शुद्ध १५ शनिवार दाभोळकर जहागीरदार यांनी गाव मदतीने बांधली.२. कारागीर आपा दत्तू सुतार गावकर व बाळा परुसू राम सुतार गावकर वजवज सवित्रा बाळा दिवटे गावकर खर्च १०४६५

या दोन्ही शिलालेखांतून अकोळनेरच्या धार्मिक आणि सामाजिक जीवनाची महत्त्वपूर्ण माहिती मिळते. मंदिर उभारणीपासून पडवीच्या बांधकामापर्यंत जहागीरदार आणि ग्रामस्थांचा सहभाग दिसून येतो. तसेच तत्कालीन खर्च, कारागिरांची नावे आणि बांधकामाचा कालक्रम यांची नोंद असल्याने हे शिलालेख स्थानिक इतिहासाचे महत्त्वपूर्ण प्राथमिक साधन ठरतात.

या शिलालेखाचे वाचन व माहिती-संकलन पुणे येथील अनिल किसन दुधाणे यांनी केले आहे.

## आगामी झेडपी व पंचायत समिती निवडणुका मनसे ताकतीनिशी लढणार : अविनाश पालवे

**● पाथर्डी । वीरभूमी–**
तालुक्यासह दक्षिण जिल्ह्यातील शेवगाव कर्जत जामखेड तालुक्यांमध्ये आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुका महाराष्ट्र नवनिर्माण सेना राज ठाकरे यांच्या आदेशाने व संपर्क अध्यक्ष नयन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली ताकतीनिशी लढणार असून त्यादृष्टीने उमेदवारांची चाचपणी सुरू असल्याचे दक्षिण मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी सांगितले.



लवकरच चारही तालुक्याचा जिल्हा दौरा करून जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणांचा आढावा घेण्यात येणार आहे. मनसे पक्षाकडून निवडणूक लढवण्यासाठी अनेकजण इच्छुक असून इतर पक्षातील कार्यकर्ते संपर्कात आहेत तसेच आपण स्वतः सरपंच असल्याने जिल्ह्यातील सरपंचांशी चांगला संपर्क असून याचा देखील आगामी निवडणुकांमध्ये पक्षाला फायदा होणार आहे आजपर्यंत पक्षाने जनहिताची अनेक आंदोलने केली असून अनेक समस्या मार्गी लावल्या आहेत याचा निश्चित फायदा निवडणुकांमध्ये पक्षाला होईल व मनसे हा एक उत्तम पर्याय जनतेसमोर असेल, असे पालवे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

यावेळी उपजिल्हाध्यक्ष बंडू हंडाळ, पाथर्डी तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ, शेवगाव तालुकाध्यक्ष मंगेश पाखरे उपस्थित होते.

## अकोले तालुका मेडिकल असोसिएशनच्या कार्याध्यक्षपदी डॉ. नितीन चासकर व डॉ. निमनाथ चौधरी यांची निवड

**● अकोले । वीरभूमी–**
अकोले तालुका मेडिकल असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्ष डॉ. सखाराम घनकुटे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. यावेळी नवीन कार्यकारिणीमध्ये कार्याध्यक्ष म्हणून डॉ. नितीन चासकर व डॉ. निमनाथ चौधरी यांची निवड करण्यात आली. तर उपाध्यक्षपदी डॉ. दर्शन बंगाळ, डॉ. संतोष देशमुख, डॉ. संतोष कानवडे, डॉ. रविंद्र डावरे आणि डॉ. प्रमोद कोंढवळे यांची निवड करण्यात आली.







सहसचिव म्हणून डॉ. अनुप्रिता शिंदे, स्पोर्ट्स सेक्रेटरी म्हणून डॉ. सागर कोल्हाळ व डॉ. उज्ज्वला वैद्य, तर सांस्कृतिक सचिव म्हणून डॉ. सतीश वाळुंज आणि डॉ. मंजुश्री राहणे यांची निवड झाली.

सीएमई समितीवर डॉ. असिफ तांबोळी, डॉ. तेजस शाह आणि डॉ. देविदास नवले यांची, तर आत्मा ट्रिप समितीवर डॉ. प्रकाश वाकचौरे, डॉ. सुनील वैद्य, डॉ. मनीषा नाईकवाडी आणि डॉ. कावेरी काकड यांची निवड करण्यात आली.

यावेळी डॉ. अजित नवले यांनी नवीन कार्यकारिणीकडून समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची अपेक्षा व्यक्त केली. डॉ. संदीप कडलग यांनी रुग्ण व डॉक्टर यांच्यात सुसंवाद वाढविणे, विविध आरोग्य शिबिरे आयोजित करणे, तालुक्यातील आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणे तसेच 'आत्मा भवन' उभारणीसाठी कार्य करण्याचा विश्वास व्यक्त केला.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून डॉ. विष्णू बुळे, डॉ. उल्हास कुलकर्णी आणि डॉ. सचिन नवले यांनी काम पाहिले.

सभेला डॉ. सुभाष सोमण, डॉ. अनिल वाघ, डॉ. उमा कुलकर्णी यांच्यासह तालुक्यातील अनेक डॉक्टर सदस्य उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन सचिव डॉ. जयसिंग कानवडे यांनी केले.

# लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त भिंगारमध्ये अभिवादन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
अखंड इंदिरानगर ग्रुप, भिंगार शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि हरदिन मॉर्निंग ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. महापुरुषांच्या विचारांचा जागर घडविण्यासोबतच स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सकाळी भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क येथे वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करत विविध प्रकारची रोपे लावण्यात आली. त्यानंतर भिंगारमधील इंदिरानगर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. परिसर स्वच्छ करून नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली.

यानंतर लोकशाहीर आण्णाभाऊ साठे, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून फुलांची उधळण करण्यात आली. उपस्थितांनी महापुरुषांच्या कार्याला अभिवादन करत त्यांच्या विचारांचा अंगीकार करण्याचा संकल्प केला.

यावेळी हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, जहीर सय्यद, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे भिंगार शहराध्यक्ष शिवम भंडारी, अशोक पराते, सचिन चोपडा, दिलीप ठोकळ, सर्वेश सपकाळ, सुभाष होडगे, विलास तोडमल, संजय भिंगारदिवे, दीपक धाडगे, ताराचंद ठोकळ, रतन मेहेत्रे, अर्जुन बेरड, भारत ठोकळ, मच्छिंद्र बेरड, असलम शेख, शुभम टाक, विलास मिसाळ, रामचंद्र शिंदे, अनंत सदलापूर, काशिनाथ साळुंखे, प्रकाश माळगे, गोरख वाघुंबरे, सुंदर पाटील, शरद ठोकळ, योगेश चौधरी, सरदारसिंग परदेशी, सुधीर कपाळे, अविनाश पोतदार, विकास भिंगारदिवे, मनोहर दरवडे, दीपक घोडके, रामनाथ गर्जे, प्रकाश देवळालीकर, दीपक अमृत यांच्यासह युवक आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संजय सपकाळ म्हणाले की, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांचे विचार व कार्य आजही समाजाला प्रेरणा देणारे आहेत. दोन्ही महापुरुषांनी समाजासाठी स्वत:ला अर्पण करून दिशा दिली. वृक्षारोपण आणि स्वच्छता अभियान हीच त्यांना खरी आदरांजली आहे. पर्यावरण संवर्धन, सामाजिक एकात्मता आणि जनजागृतीसाठी अशा उपक्रमांची सातत्याने आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.



सुभाष होडगे म्हणाले की, स्वच्छ परिसर आणि हरित पर्यावरण ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. समाजातील युवकांनी पुढाकार घेतल्यास अनेक सकारात्मक बदल घडू शकतात. महापुरुषांनी दिलेल्या समानता, बंधुता आणि राष्ट्रसेवेच्या विचारांचा प्रसार प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे काम केले पाहिजे.

संजय भिंगारदिवे म्हणाले की, महापुरुषांचे कार्य आणि त्यांचे विचार समाजाला नवी दिशा देणारे आहेत. त्यांच्या स्मृतिदिनी सामाजिक उपक्रम राबविल्यामुळे नागरिकांमध्ये जनजागृती होते. स्वच्छता, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक सलोखा या मूल्यांना बळकटी देण्यासाठी प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात करण्याची गरज असल्याचे ते म्हणाले.

सचिन चोपडा म्हणाले की, हा कार्यक्रम केवळ जयंती व स्मृतिदिन साजरा करण्यापुरता मर्यादित नसून समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी व्यक्त करणारा आहे. युवकांनी सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेतला तर समाज अधिक प्रगत आणि सुसंस्कृत होईल. महापुरुषांचे विचार आत्मसात करून सेवा, समर्पण आणि राष्ट्रहिताची भावना जोपासणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## प्रगतिशील लेखक संघाच्या सहाव्या राज्य अधिवेशनाचे उद्घाटन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

प्रगतिशील लेखक संघाने आजच्या नव्या पिढीतील लेखकांना अधिक संधी दिली पाहिजे. नवी पिढी संवेदनशील आहे हे त्यांनी दिल्ली येथील आपल्या आंदोलनातून सिद्ध केले आहे. त्यामुळे जे काही प्रगतिशील आंदोलने आहेत त्यांना टाळून चालणार नाही, असे प्रतिपादन प्रसिद्ध नाट्य कलावंत संजीव जीवने यांनी केले. अहिल्यानगर येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात आयोजित प्रगतिशील लेखक संघाच्या सहाव्या अधिवेशनाचे उद्घाटन शनिवारी (दि.१ ऑगस्ट) संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करुन झाले. यावेळी ते बोलत होते. प्रगतिशील लेखक संघाचे राज्याध्यक्ष जी. के. ऐनापुरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या अधिवेशनाप्रसंगी स्वागताध्यक्ष कॉ. सुभाष लांडे, डॉ. स्मिता पानसरे, झारखंडचे हिंदी कादंबरीकार रणेंद्र, प्रगतिशील लेखक संघाचे राष्ट्रीय सचिव विनीत तिवारी, राज्य कार्याध्यक्ष येशू पाटील, शंकर ब्रह्मे विज्ञान ग्रंथालयाचे नितीन ब्रह्मे, कॉ. राजू देसले, राज्य महासचिव कॉ. राकेश वानखेडे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे हिंदी कादंबरीकार रणेंद्र,म्हणाले, की मराठी साहित्य विश्वामध्ये दया पवारांचे बलुत, लक्ष्मण गायकवाड यांचे उचल्या, शरणकुमार लिंबाळे यांचे अक्करमाशी असे दलित आत्मकथनानी त्यांनी सर्व भारतीय भाषांना प्रभावित केले. त्याचबरोबर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख, शाहीर गव्हाणकर यांनी आपल्या शाहिरी परंपरेतून देखील प्रागतिक विचार पेरण्याचे काम केले. महाराष्ट्रात साहित्य शाहिरीच्या माध्यमातून कला संस्कृती चे परंपरा जपण्याचे काम केले विनीत तिवारी म्हणाले. अण्णा भाऊ साठे, मुंशी प्रेमचंद, यासारखे साहित्यिक हे केवळ मराठी भाषेपुरते मर्यादित राहिले नाही तर त्यांचे साहित्य सर्व भाषेत पोहोचले. आपल्याला मिळालेल्या क्रांतिकारी विचारांचा दायित्व आणि त्याची ताकद याचा स्मरण करणे अत्यंत गरजेचे आहे लेखकांनी आपल्या साहित्याला आंदोलनाचे हत्यार बनवले पाहिजे. कॉ. स्मिता पानसरे म्हणाल्या की, साहित्यिकांचे मौन म्हणजे अन्यायाला दिलेली मूक संमती आहे. साहित्य हे परिवर्तनाचे साधन आहे. साहित्यामधून आपले आरोग्य, शिक्षण, रोजगार, अन्याय अत्याचार, शोषण हे विषय देखील साहित्यातून हाताळले पाहिजेत आणि दलित वंचित शोषित घटकांना आपल्या साहित्यातील नायक केले पाहिजे त्यासाठी नवी सांस्कृतिक चळवळ उभी करणे गरजेचे आहे समाज बदलण्यासाठी काय लिहिले पाहिजे त्याचा विचार करण्याबरोबरच कृती देखील करणे महत्त्वाचे आहे त्यासाठी नव तरुणांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. स्वागत अध्यक्ष सुभाष लांडे यांनी आपल्या स्वागत पर भाषणातून अहिल्यानगर जिल्ह्यातील परिवर्तनवादी चळवळीचा इतिहास सांगितला. यावेळी नितीन ब्रह्मे, येशू पाटील, राजू देसले, जी.के. ऐनापुरे यांची ही भाषणे झाली.

## रामराव टकले यांचे निधन

**● पाथर्डी । वीरभूमी–**



तालुक्यातील हत्राळ येथील रामराव दादाबा टकले यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, भाऊ, दोन मुले, तीन मुली, पुतणे नातवंडे असा मोठा परिवार आहे. हत्राळ गावचे उपसरपंच तथा खादी ग्रामोद्योग संघाचे संचालक परमेश्वर टकले व शेषराव टकले यांचे ते वडील होत. रामराव टकले हे पाडळी सोसायटीचे पाच वर्षे संचालक होते. ते अतिशय धार्मिक व शांत स्वभावचे म्हणुन परिचित होते. त्यांच्या अकाली निधनाने परिसरामध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंच्या विचारांनी महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीला नवी दिशा दिली

### आमदार आशुतोष काळे । लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त कोपरगाव येथे अभिवादन

**● कोपरगाव । वीरभूमी –**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य, शाहिरी आणि सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीला नवी दिशा दिली. त्यांनी उपेक्षित, कष्टकरी आणि वंचित घटकांच्या व्यथा प्रभावीपणे मांडून समानता, न्याय आणि स्वाभिमानाचा संदेश दिला. स्वातंत्र्य चळवळ व संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात त्यांचे योगदान सदैव प्रेरणादायी राहील असे प्रतिपादन आमदार आशुतोष काळे यांनी केले.


छाया । जनार्दन जगताप

समाजातील शोषित, वंचित आणि सर्वसामान्यांच्या जीवन संघर्षाला आपल्या लेखणी व शाहिरीतून आवाज देणारे थोर साहित्यिक, लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आमदार आशुतोष काळे यांनी कोपरगाव येथील त्यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांचे विचार आजही समाजाला एकतेचा, संघर्षाचा आणि परिवर्तनाचा मार्ग दाखवतात. त्यांच्या विचारांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सामाजिक समता,न्याय आणि सर्वसमावेशक विकासासाठी कार्यरत राहणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच कोपरगाव शहरात विविध ठिकाणी जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या सामाजिक कार्यक्रमांना आमदार आशुतोष काळे यांनी भेट देवून सर्वांना शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी नितीन साबळे, अर्जुन मरसाळे, राजेंद्र खैरनार, दिलीप तुपसुंदर, संतोष मरसाळे, सुनिल वैरागळ, राजेंद्र वैरागळ, संजय साळवे, भागवत साहेब, रवी धिवर, भारत सदर, राजेंद्र कांबळे, समाधान शिंदे, बुधा भालेराव, सचिन आहिरे, अनिल आवारे, सचिन पाटोळे, पवन निर्मळ, शुभम आहिरे, अरुण मरसाळे, अजय जगधने, नितीन ताकवणे, विजय मरसाळे, राहुल सौदागर, दिपक मरसाळे, आकाश मरसाळे, अमोल सौदागर, दिनेश गायकवाड, मयूर रीळ, ज्ञानेश्वर घोडेस्वार, सनी रिळ, रंगनाथ मरसाळे, रवींद्र मरसाळे, नामदेव पगारे, मंगेश मरसाळे, रणवीर आहिरे, किशोर आहिरे, फकीरा चंदनशिव, संदिप निरभवणे आदी समाजबांधवांसह सुनिल गंगुले, नगरसेवक मंदार पहाडे, राजेंद्र वाकचौरे, शैलेश साबळे, विजय त्रिभुवन, संदिप कपिले, राहुल शिरसाठ, इम्तियाज अत्तार, सोमनाथ आढाव, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक दिनार कुदळे, माजी नगरसेवक कृष्णा आढाव, बाळासाहेब आढाव, शिवाजी खांडेकर, रमेश गवळी, फकीर कुरेशी, दिनकर खरे, अरुण त्रिभुवन, सचिन परदेशी, जावेद शेख, राहुल सोनवणे, राजेंद्र जोशी, मुकुंद भूतडा, प्रशांत वाबळे, सागर आहेर, संदिप सावतडकर, विशाल निकम, अनिल जाधव, प्रसाद रुईकर, प्रदीप कुऱ्हाडे, योगेश वाणी, गणेश गोसावी, नितीन शेलार, मयूर राऊत, भाऊसाहेब भाबड, संजय दुशिंग, राजेंद्र उशिरे, दिनेश गाडेकर, ओम आढाव, हर्षल जैस्वाल, हारुण शेख, अजय शेळके उपस्थित होते.

## आदिशक्ती अभियानात ढोकरी ग्रामपंचायतीचा प्रथम क्रमांक

### महिला सक्षमीकरणातील उत्कृष्ट कार्याची तालुकास्तरावर दखल

**● अकोले । वीरभूमी–**

महाराष्ट्र शासनाच्या 'आदिशक्ती अभियान २०२५-२६' अंतर्गत महिला सक्षमीकरण, सामाजिक विकास आणि आर्थिक प्रगती या क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल ढोकरी ग्रामपंचायतीने तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून मानाचा बहुमान मिळविला आहे.

ग्रामपंचायतीने महिला बचत गटांचे सक्षमीकरण, महिलांना स्वावलंबनाकडे प्रोत्साहन, अंगणवाडी व आरोग्य सेवा अधिक सक्षम करणे तसेच शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी यावर सातत्याने भर दिला. ग्रामपंचायत, महिला लोकप्रतिनिधी, विविध शासकीय यंत्रणा आणि ग्रामस्थ यांच्या समन्वित प्रयत्नांतून हे यश संपादन झाले.

या यशाचे श्रेय सरपंच सौ. शैला भगवान करवर, उपसरपंच किसन रेवजी शेटे, ग्रामसेवक अशोक कडनर, सर्व ग्रामपंचायत सदस्य, महिला लोकप्रतिनिधी, महिला बचत गटांच्या अध्यक्षा व सचिव, अंगणवाडी सेविका व मदतनीस, आशा सेविका, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच समस्त ग्रामस्थ यांच्या एकजुटीच्या कार्याला दिले जात आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल ग्रामपंचायतीवर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, भविष्यातही शासनाच्या विविध विकासात्मक व लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून ढोकरी ग्रामपंचायत आदर्श ग्रामपंचायत म्हणून अधिक सक्षम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

## अकोलेत 'वाचनरंग ग्रंथालय' उपक्रमाचा शुभारंभ

### साऊ एकल महिला समितीचा पुढाकार । वाचन संस्कृती रुजविण्याचा संकल्प

**● अकोले । वीरभूमी–**

साऊ एकल महिला समितीच्या वतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त दि. १ ऑगस्ट रोजी 'वाचनरंग ग्रंथालय' या उपक्रमाचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला.


छाया । विद्याचंद्र सातपुते

अकोले तालुक्यातील एकल महिलांसह सर्व महिलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, ज्ञानाची देवाणघेवाण वाढावी आणि विचार समृद्ध व्हावेत या उद्देशाने हे ग्रंथालय सर्व महिलांसाठी मोफत खुले करण्यात आले आहे. तसेच दर महिन्याला वाचलेल्या पुस्तकांवर खुल्या चर्चेचे आयोजन करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाला डॉ. उमा कुलकर्णी, मॉडर्न हायस्कूलच्या प्राचार्या जयश्री ननावरे, अनिता बंगाळ, नगरसेविका प्रतिभा मनकर, नगरसेविका शीतल वैद्य आणि नीता मुंदडा उपस्थित होत्या. मान्यवरांच्या हस्ते झाडाला पाणी घालून पर्यावरणपूरक पद्धतीने ग्रंथालयाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी वाचन हे व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी साधन असून, पुस्तकांमुळे ज्ञान, आत्मविश्वास, सकारात्मक विचार आणि योग्य निर्णयक्षमता विकसित होते. त्यामुळे प्रत्येक महिलेने वाचनाची सवय जोपासावी, असा संदेश दिला.

कार्यक्रमाचे नियोजन नाजेमा शेख, वर्षा बेळे, कीर्ती पांगरे, अर्चना भोर, कविता कामठे, छाया कोटकर, रेखा कोटकर, सीमा भागवत आणि वैशाली राजगुरू यांनी केले. यावेळी महिलांनी वाचनातून मिळालेले अनुभवही कथन केले. सूत्रसंचालन प्रतिमा कुलकर्णी यांनी केले.

साऊ एकल महिला समितीच्या या उपक्रमामुळे अकोले तालुक्यात महिलांमध्ये वाचन संस्कृती रुजण्यास तसेच ज्ञानाधिष्ठित समाज घडविण्यास निश्चितच हातभार लागणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# 'माझी शाळा, बालविवाहमुक्त शाळा' अभियानातून विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

### उडान प्रकल्पाचा पारनेरमध्ये उपक्रम । ७३ शाळांतील ३७ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत बालसुरक्षेचा संदेश

**● पारनेर । वीरभूमी –**

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त न्यू इंग्लिश स्कूल, पारनेर येथे स्नेहालयच्या उडान प्रकल्पांतर्गत 'माझी शाळा, बालविवाहमुक्त शाळा' या अभियानाचा जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला.

विद्यार्थ्यांमध्ये बालविवाह, बाल लैंगिक शोषण, बालहक्क आणि मुलींच्या सुरक्षिततेबाबत जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पारनेरचे पोलीस निरीक्षक संतोष खेडकर होते. यावेळी उडान प्रकल्पाचे व्यवस्थापक प्रवीण कदम, युवा निर्माण प्रकल्पाचे विकास सुतार, प्राचार्य के. बी. शिंदे, पर्यवेक्षक अजित दिवटे, ज्युनिअर कॉलेज समन्वयक सतीश फापाळे, जुलेखा शेख, मनिषा जगदाळे, बापुराव होळकर, युवा नेते नियाज राजे, सामाजिक कार्यकर्ते शशिकांत शिंदे, नेहा धिवरे आणि पत्रकार भगवान गायकवाड आदी उपस्थित होते.

प्रवीण कदम यांनी विद्यार्थ्यांना बालविवाह प्रतिबंधक कायदा, बाल लैंगिक शोषणापासून संरक्षण कायदा (झजउडज), बालहक्क आणि मुलींच्या सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन केले. नकळत झालेली एक चूक आयुष्यभर संकट निर्माण करू शकते, असे सांगत त्यांनी प्रेमाचे आकर्षण, सोशल मीडियाचा वापर, अनोळखी व्यक्तींशी मैत्री आणि आमिषांना बळी पडण्याचे धोके विविध उदाहरणांतून स्पष्ट केले.

मुलींनी स्वतःच्या सुरक्षिततेसाठी अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नये, त्यांच्याकडून खाण्यापिण्याच्या वस्तू स्वीकारू नयेत, त्यांच्यासोबत कुठेही जाऊ नये, वैयक्तिक माहिती अथवा


छाया । भगवान गायकवाड

फोटो शेअर करू नयेत तसेच संशयास्पद घटना घडल्यास तात्काळ पालक, शिक्षक किंवा विश्वासू व्यक्तीला माहिती द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

बालविवाहाबाबत बोलताना कदम यांनी सांगितले की, मुलीचे किमान विवाहयोग्य वय १८ वर्षे, तर मुलाचे २१ वर्षे आहे. बालविवाहामुळे शिक्षण, आरोग्य, मानसिक स्वास्थ्य, सुरक्षितता आणि भविष्यातील संधी धोक्यात येतात. हा केवळ सामाजिक प्रश्न नसून कायद्याने गंभीर गुन्हा आहे.

उडान प्रकल्प २०२७ अखेरपर्यंत अहिल्यानगर जिल्हा बालविवाहमुक्त करण्याच्या उद्देशाने जनजागृती, बालविवाह प्रतिबंध, शिक्षण, पुनर्वसन, आरोग्य आणि स्वावलंबन या सहा सूत्रांवर कार्यरत आहे. मागील जूनपासून अभियानांतर्गत ७३ शाळांमध्ये जनजागृती करण्यात आली असून, ३७ हजार ५८० विद्यार्थ्यांपर्यंत बालविवाहविरोधी आणि बालसुरक्षेचा संदेश पोहोचविण्यात आला असल्याची माहिती कदम यांनी दिली.

अध्यक्षीय मनोगतात पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांनी बालविवाहाच्या कायदेशीर परिणामांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. बालविवाह हा बालकांच्या मूलभूत हक्कांवर आणि भविष्यावर घातलेला मोठा घाव आहे. अशा विवाहामुळे मुलींच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होतात, असे ते म्हणाले.

बालविवाह घडवून आणण्यासाठी किंवा त्याला मदत करणारे आई-वडील, नातेवाईक, धर्मगुरू, मंडप चालक, बँड पथक, डीजे, ब्युटी पार्लर चालक, मेहंदी कलाकार, आचारी तसेच प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या संबंधितांवरही कायदेशीर कारवाई होऊ शकते. बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार दोषींना दोन वर्षांपर्यंत कारावास आणि एक लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद असल्याची माहिती त्यांनी दिली.

विद्यार्थ्यांना शिक्षित, सुरक्षित आणि आत्मनिर्भर बनवणे हीच खरी सामाजिक संपत्ती असून, बालविवाहमुक्त समाजनिर्मितीसाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

परिसरात बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यास नागरिकांनी उडान हेल्पलाईन ९०११०२६४९५ किंवा पोलीस हेल्पलाईन ११२ वर तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमास न्यू इंग्लिश स्कूलमधील शेकडो विद्यार्थी, शिक्षक व पालक उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन ज्ञानेश्वर कवडे यांनी केले, तर मुख्याध्यापक के. बी. शिंदे यांनी आभार मानले.

# साखर कामगारांनी काळानुरूप बदलणे गरजेचे

## आ. आशुतोष काळे । शिर्डी येथे साखर कामगार कार्यकर्ता मार्गदर्शन शिबिराची सांगता



■ छाया । जनार्दन जगताप

**● कोपरगाव । वीरभूमी–**
पूर्वीच्या तुलनेत आज साखर कारखानदारीमध्ये मोठा बदल झाला असून अनेक कारखाने आता स्वयंचलित झाले आहेत. तंत्रज्ञान आधुनिक यंत्रणा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांमुळे कामाची पद्धत पूर्णपणे बदलली आहे. या बदलत्या काळात भविष्यातील आव्हानांचा सामना करण्यासाठी आणि कारखान्याची उत्पादकता वाढवण्यासाठी साखर कामगारांनी काळानुरूप स्वतःमध्ये बदल करून आधुनिक प्रशिक्षण घेणे अत्यंत गरजेचे आहे असे प्रतिपादन आमदार आशुतोष काळे यांनी केले. महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाच्या वतीने शिर्डी येथे आयोजित साखर कामगार कार्यकर्ता मार्गदर्शन शिबिराच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते.

पुढे बोलताना आ. आशुतोष काळे म्हणाले की, साखर उद्योग हा ग्रामीण महाराष्ट्राचा मुख्य आर्थिक कणा आहे. हा उद्योग केवळ साखर निर्मितीपुरता मर्यादित नसून यावर हजारो कामगारांच्या संसार प्रपंच अवलंबून आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाला योग्य भाव आणि कामगारांच्या श्रमाला योग्य मोबदला देऊन त्यांना सन्मान मिळवून देण्याचे काम या उद्योगातून होते. शेतकरी आणि कामगार हे या साखर उद्योग रथाची दोन महत्त्वाची चाके आहेत. यातील एकाही चाकात बिघाड झाला तर हा उद्योगरूपी रथ पुढे चालू शकत नाही. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होण्यास मोठी मदत होत आहे.

कर्मवीर शंकरराव काळे साहेब यांनी सरकार, कामगार आणि शेतकरी यांची देणी कोणत्याही परिस्थितीत थकीत ठेवायची नाहीत हा कानमंत्र दिला आहे. त्या मूलमंत्रावर माजी आमदार अशोकराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना प्रगतीपथावर आहे.

कामगार घेत असलेल्या परिश्रमाचा त्यांना योग्य मोबदला देणे ही कारखान्याची पहिली जबाबदारी आहे. कामगार हा शेतकरी आणि साखर उत्पादक यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहे. त्यामुळे कामगारांच्या अडचणी व्यवस्थापन मंडळाने वेळेवर समजून घेऊन त्या सोडवल्या पाहिजेत.

कारखान्याची उत्पादकता वाढवण्यासाठी, शेतकऱ्यांना जास्तीचा मोबदला देण्यासाठी आणि आपल्या कामगारांच्या वेतनात वाढवण्यासाठी भविष्यात होणारे तांत्रिक बदल कामगारांनी आत्मसात केले पाहिजेत. त्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण घेऊन सर्वांनी या उद्योगाच्या प्रगतीसाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प करावा असे आवाहन आ. आशुतोष काळे यांनी केले.

कृषी, सहकार आणि साखर उद्योगाची अजितदादांना सखोल जाण होती. साखर कामगारांच्या वेतनाच्या प्रश्नावर त्रिपक्षीय समितीला योग्य सल्ला आणि मार्गदर्शन देण्याचे महत्त्वपूर्ण काम अजितदादांनी केले होते. त्यामुळे अशा प्रसंगी त्यांची आठवण आल्याशिवाय राहत नाही असे आवर्जून सांगितले.

यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, मुळा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन भाऊसाहेब मोटे, छत्रपती सहकारी साखर कारखाना, इंदापूरचे व्हा. चेअरमन शिवाजीराव निंबाळकर, महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे, सरचिटणीस रावसाहेबजी पाटील, उपाध्यक्ष दत्तात्रय निमसे, अशोकराव पवार आदींसह महाराष्ट्र राज्य साखर कामगार मंडळाचे पदाधिकारी, राज्यभरातील साखर कामगार आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मूळ मार्गानेच नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वे करा, अन्यथा जनआंदोलन उभारणार

## दशरथराव सावंत यांचा प्रशासन व सरकारला इशारा

**● अकोले । वीरभूमी–**
नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वे प्रकल्प मूळ संकल्पित मार्गानेच मार्गी लावावा, अन्यथा अकोले व संगमनेर तालुक्यातील जनतेच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शेतकरी नेते दशरथराव सावंत यांनी पत्रकार परिषदेत दिला.

येत्या काही दिवसांत त्यांच्या मूळ गावी रुंभोडी येथे या मागणीसाठी एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

सावंत म्हणाले, नाशिक-पुणे रेल्वे मार्गाची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. खेड ते नाशिक या प्रस्तावित मार्गावरील तत्कालीन खासदार व आमदारांनी हा प्रश्न सातत्याने लावून धरला होता. विद्यमान खासदारांनीही संसदेत वारंवार पाठपुरावा केला. २०१२ मध्ये



या रेल्वे मार्गास मंजुरी मिळून सर्वेक्षणही पूर्ण झाले. मात्र, अद्याप प्रकल्पाबाबत शासनाची स्पष्ट भूमिका समोर आलेली नसल्याने अकोले व संगमनेर तालुक्यात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या प्रश्नावर संबंधित आमदार आणि खासदारांनी शासनस्तरावर नेमके काय निर्णय झाले, याची स्पष्ट माहिती जनतेसमोर मांडावी. सरकारचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी प्रकल्पाबाबतची वस्तुस्थिती जनतेला सांगावी, अशी मागणी सावंत यांनी केली.

नाशिक-पुणे महामार्गालगत, सह्याद्रीच्या पट्ट्यातून जाणारा मूळ संकल्पित रेल्वे मार्ग कायम ठेवण्यासाठी लोकप्रतिनिधींनी आक्रमक भूमिका घ्यावी. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास अकोलेचा ग्रामीण व आदिवासी भाग शहरांशी जोडला जाईल. तसेच शिक्षण, रोजगार आणि दळणवळणाच्या दृष्टीने नव्या पिढीला पुणे व नाशिकसारख्या शहरांपर्यंत जलद पोहोचणे शक्य होईल, असे त्यांनी सांगितले.

खेड-नाशिक या मूळ रेल्वे मार्गावरील सर्व लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाचा लेखाजोखा जनतेसमोर मांडावा. अन्यथा अकोले व संगमनेर तालुक्यातील जनतेच्या सहभागातून मोठे जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा दशरथराव सावंत यांनी दिला.

# वृद्ध साहित्यिक व लोककलावंतांच्या मानधनवाढीसह विविध सवलतींसाठी आमदार मोनिका राजळे यांच्याकडे मागणी

**● पाथर्डी । वीरभूमी–**
राज्य शासनाकडून मानधन घेणाऱ्या वृद्ध साहित्यिक व लोककलावंतांना सन्मानाने जीवन जगता यावे, यासाठी त्यांच्या मानधनात भरीव वाढ करून विविध शासकीय सवलती देण्याची मागणी ज्येष्ठ साहित्यिक, संगीत विशारद तथा मानधनप्राप्त कलावंत रमेश विठ्ठल घोडके यांनी शेवगाव-पाथर्डी विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मोनिका राजळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.


■ छाया । अनिल खाटेर

पाथर्डी येथे घोडके यांनी सादर केलेल्या निवेदनात वृद्ध साहित्यिक आणि लोककलावंतांच्या अडचणी अधोरेखित करत अनेक महत्त्वपूर्ण मागण्या मांडल्या आहेत.

निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, वयोमान वाढल्यानंतर अनेक साहित्यिक व कलावंतांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत शासनाकडून मिळणारे सध्याचे मानधन अत्यल्प असून त्यातून औषधोपचाराचाही खर्च भागत नाही.

याशिवाय राज्य शासनाच्या मानधन योजनेतील पात्र वृद्ध साहित्यिक व कलावंतांचा केंद्र शासनाच्या संबंधित योजनांमध्ये समावेश करून त्यांनाही त्याचा लाभ मिळावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच मानधनप्राप्त कलावंतांना घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा आणि एसटी प्रवासात ७५ टक्के सवलत लागू करावी, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

वृद्ध साहित्यिक आणि लोककलावंतांनी आयुष्यभर सांस्कृतिक, साहित्यिक व लोकपरंपरेचे जतन करण्यासाठी मोठे योगदान दिले असून त्यांच्या वृद्धापकाळात शासनाने अधिक संवेदनशील भूमिका घेत आर्थिक व सामाजिक आधार द्यावा, अशी अपेक्षा निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

आमदार मोनिकाताई राजळे यांनी या मागण्यांचा सकारात्मक विचार करून त्या शासनस्तरावर मांडाव्यात, अशी अपेक्षा रमेश घोडके यांनी व्यक्त केली आहे.

# टिळक पुण्यतिथीनिमित्त आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा उत्साहात

## महात्मा सार्वजनिक वाचनालयाचा उपक्रम । सुमारे ४० विद्यार्थ्यांचा सहभाग, विजेत्यांचा रोख पारितोषिके व स्मृतिचिन्ह देऊन गौरव

**● शेवगाव । वीरभूमी –**
येथील महात्मा सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने अखंडित गौरवशाली परंपरा लाभलेल्या टिळक पुण्यतिथी निमित्त आयोजित आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा न्यायमूर्ती रानडे सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाल्या. विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत प्रभावी वक्तृत्वाची झलक सादर केली.

स्पर्धेचा प्रारंभ लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून करण्यात आला. यानंतर वक्तृत्व स्पर्धांना सुरुवात झाली. यावेळी इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या विविध शाळांतील सुमारे ४० स्पर्धकांनी विविध सामाजिक, शैक्षणिक व राष्ट्रप्रेम जागविणाऱ्या विषयांवर प्रभावी भाषणे सादर केली.

इयत्ता पाचवी ते सातवी या लहान गटात साईशा सूर्यवंशी हिने प्रथम क्रमांक पटकावला. प्रतीक्षा कोल्हे हिला द्वितीय, तर एमन पटेल याला तृतीय क्रमांक मिळाला. वैष्णवी डमाळ, कार्तिकी चौधरी आणि अनवी व्यवहारे यांना उत्तेजनार्थ पारितोषिके प्रदान करण्यात आली. आठवी ते दहावी या मोठ्या गटात प्रियांका बैरागी हिने प्रथम क्रमांक मिळविला. आर्यन भालेराव द्वितीय, तर श्रावणी मरकड तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली. चार्वी बाफना, स्वामिनी जाधव आणि वेदांती जोशी यांना उत्तेजनार्थ पारितोषिकांनी गौरविण्यात आले.

या स्पर्धेतील विजेत्यांना महात्मा सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. रमेश भारदे व सचिव हरीश भारदे यांच्या हस्ते रोख रक्कम, प्रशस्तीपत्रे तसेच स्वातंत्र्यसैनिक देवणे मामा स्मरणार्थ स्मृतिचिन्हे देऊन सन्मानित करण्यात आले. मोठ्या गटासाठी हरिभाऊ नजन व प्रा. सोपान नवथर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले, तर लहान गटासाठी उमेश पन्हाळे व प्रा. प्रकाश दहिफळे यांनी परीक्षकांची जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश मोरे यांनी केले.

यावेळी वाचनालयाचे विश्वस्त मधुकर देवणे, डॉ. ओंकार रसाळ, ग्रंथपाल साजिद शेख यांच्यासह विविध शाळांतील स्पर्धक, मार्गदर्शक शिक्षक, पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमधील वक्तृत्वकला, आत्मविश्वास आणि वैचारिक अभिव्यक्तीला चालना मिळाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.



शेवगाव : टिळक पुण्यतिथी निमित्त आयोजित आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानित करताना प्रा. रमेश भारदे, हरीश भारदे व अन्य मान्यवर. (छाया : अमोल कराळे)